# पोलीस आयुक्तालय

## मिरा-भाईंदर, वसई-विरार

सेक्टर - ०५, रामनगर शांती गार्डन मिरारोड पुर्व ठाणे ४०११०७

Email ID - dcphq.mb-vv@mahapolice.gov.in


जा.क्र.विशा/टे-६/पासपोर्ट पडताळणी कार्यपध्दती/२०२३- ७०७६ दिनांक :- ०८/०८/२०२३

प रि प त्र क :

विषय :- पारपत्र पडताळणीकरीता कार्यपद्धती.

संदर्भ :- १. क्र. पोमंस/२०/१९५/पारपत्र पडताळणी कागदपत्रे/२१४/२०१८, मुंबई, दिनांक - ०९/१२/२०२२ अन्वये.

२. **Ministry of External Affair,Govt. of India,New Delhi** यांचे कडील क्र.1/Pass(A2)/2023(30)-II-1864, Date – 21/06/2023

-------ooo-------

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा. क्षेत्रीय पारपत्र कार्यालय, मुंबई यांचेकडुन वेळोवेळी पारपत्र अर्जदारांचे पोलीस पडताळणी कार्यपद्धतीत सुधारणा करण्यात आलेली आहे. **पारपत्र अर्जाच्या पडताळणीमध्ये मुख्यत्वे पोलीस विभागाकडुन देण्यात येणारा पोलीस पडताळणी अहवाल (Police Verification Report-परिशिष्ट - १) ही महत्वाची प्रक्रिया** आहे. त्याअनुषंगाने सदर प्रक्रियेमध्ये निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी व त्यामुळे पारपत्र अर्जदार यांना होणारा नाहक त्रास टाळण्यासाठी सोपी, कार्यक्षम आणि पारदर्शक प्रक्रिया राबविण्यासाठी खालील कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

पारपत्राकरीता अर्जदार हे ऑनलाइन पासपोर्ट सेवा केंद्र येथे त्यांचा अर्ज सादर करतात. त्यावेळेस अर्जदार यांच्यासंबंधी काही आवश्यक त्या पुराव्याच्या कागदपत्रांची आवश्यकता असते. अर्जदार यांनी सादर केलल्या कागदपत्रांची/पुराव्यांची पडताळणी होऊन वेळेत पुर्तता करणे आवश्यक आहे. जेणेकरुन पारपत्र पडताळणी प्रक्रियेमध्ये विलंब न होता त्याबाबत विहीत वेळेत पुर्तता होईल.

अर्जदार व पारपत्र पडताळणी अधिकारी यांना चांगल्या पद्धतीने आवश्यक कागदपत्रांची माहिती होईल तसेच सुरक्षेचे उद्दिष्ट अबाधित राखून, दक्षता घेत तपासणी प्रक्रिया सहज सुलभ होवुन नागरिकांना चांगली सुविधा मिळण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

## भाग – १

➢ पारपत्र पडताळणीचे कामकाज करणारे गोपनिय अंमलदार यांनी ऑनलाइन पारपत्र अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रथम पारपत्र नोंद वहीमध्ये नोंद घ्यावी. पारपत्र पडताळणी फॉर्मवर आवक क्रमांक नोंदवुन सदरचा पी.पी.फॉर्म/अर्ज

घेवुन अर्जदार यांचे राहते ठिकाणी समक्ष भेट देवुन पारपत्र पडताळणी करावी. पारपत्र पडताळणीकरीता दिलेल्या निकषांच्या संदर्भात खालील कागदपत्रांची आवश्यकता असुन त्यानुसार पडताळणी करावी.

अ. ओळखीचा पुरावा :-

जन्मतारीख, अर्जदाराचे नाव, अडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, लिंग, छायाचित्र आणि स्वाक्षरी निश्चित करण्यासाठी अर्जदाराकडुन त्यासंबधीत कागदपत्रे संकलित करणे आवश्यक आहे. **जन्म प्रमाणपत्र प्रामुख्याने घेण्यात यावे.** नमुद निकष निश्चित होण्याकरीता खालील कागदपत्रांच्या यादीतील **कोणत्याही तीन** कागदपत्रांची आवश्यकता आहे.

१. जन्म प्रमाणपत्र (भारतात जन्मलेला)
२. पुर्वी धारण केलेला भारतीय पासपोर्ट
३. परिवहन विभागाने जारी केलेला चालक परवाना (Driving License)
४. बॅक पासबुकचे पहिले पान (चालु खाते - मागचे ३ महिन्याचे स्टेटमेंट)
५. आधार कार्ड/ रेशन कार्ड/मतदान कार्ड/ पॅन कार्ड/शासकीय सेवेतील ओळखपत्र.
६. राज्य शिक्षण मंडळ/सीबीआई/मान्यताप्राप्त विद्यापीठाने जारी केलेले पदवीचे प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका.
७. प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील नोंदी (Records) (शाळा/संस्थेत उपस्थिती संबंधित स्पष्टीकरण विचारणा करु शकता.)
८. शाळा सोडल्याचा दाखला/शेवटी शिकत असलेल्या शाळेने अथवा मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेने दिलेले शालांत प्रमाणपत्र.
९. पालकांचे पारपत्र ज्यावर अर्जदाराचे नाव नमुद असेल.
१०. आयकर मुल्यांकनाचे आदेश (ITR Return) किंवा राजपत्र अधिसुचना (नाव बदलल्यास)

ब. जोडीदाराच्या नावाचा पुरावा (**Name of Spouse**) :-

१. सक्षम प्राधिकरणाने जारी केलेले विवाह प्रमाणपत्र (Marriage Certificate)
२. मा. न्यायालयाचे घटस्फोट Certificate.
३. पुर्वी धारण केलेला भारतीय पासपोर्ट ज्यावर जोडीदाराचे नाव छापलेले असेल.
४. राजपत्र अधिसुचना.

क. राष्ट्रीयत्वाचा पुरावा (**Nationality Proof**) :-

भारतीय राज्यघटना, नागरिकत्व कायदा आणि नागरिकत्व प्राप्त करण्याच्या विविध पद्धतीनुसार, एखाद्या व्यक्तीचे नागरिकत्व निश्चित करण्यासाठी जी निर्णायक कागदपत्रे आवश्यक असतील, ज्यायोगे पडताळणी अधिकाऱ्याचे समाधान होईल ती कागदपत्रे घेण्यात यावीत. **यामध्ये प्रामुख्याने अर्जदार यांचा जन्म दाखला त्याचबरोबर पालकांचा (आई/वडील) जन्म दाखला घेण्यात यावा.**

१. जन्मापासुन नागरिकत्वासाठी कागदपत्रे :-

I) २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर आणि १ जुलै १९८७ पुर्वी भारतात जन्मलेले.

१. पुर्वी धारण केलेला भारतीय पारपत्र किंवा

२. जन्म प्रमाणपत्र (भारतात जन्मलेला)

३. जन्मतारीख आणि जन्म ठिकाणचा निर्णायक पुरावा.

II) १ जुलै १९८७ रोजी किंवा त्यानंतर आणि ३ डिसेंबर २००४ पुर्वी भारतात जन्मलेले.

१. पुर्वी धारण केलेला भारतीय पारपोर्ट किंवा

२. जन्म प्रमाणपत्र आणि अर्जदाराच्या पालकांपैकी कोणही एक त्याच्या/तिच्या जन्माच्यावेळी भारताचे नागरिक होते याचा पुरावा किंवा

३. जन्मतारीख आणि जन्मस्थानाचा निर्णायक पुरावा आणि अर्जदाराच्या पालकांपैकी कोणीही एक त्याच्या/तिच्या जन्माच्या वेळी भारताचे नागरिक होते याचा पुरावा.

III) ३ डिसेंबर २००४ रोजी किंवा त्यानंतर भारतात जन्मलेले.

१. पुर्वी धारण केलेला भारतीय पारपोर्ट किंवा,

२. जन्म प्रमाणपत्र आणि अर्जदाराचे दोन्ही पालक त्याच्या/तिच्या जन्माच्या वेळी भारताचे नागरिक असल्याचा पुरावा किंवा पालकांपैकी कोणही एक पालक भारताचा नागरीक आहे आणि दुसरा पालक त्याच्या/तिच्या जन्माच्या वेळी बेकायदेशीर स्थलांतरित नाही किंवा,

३. जन्मतारीख आणि जन्मस्थानाचा निर्णायक पुरावा अर्जदाराचे दोन्ही पालक भारताचे नागरिक आहेत किंवा त्याच्या/तिच्या पालकांपैकी एक भारतीय नागरिक आहे आणि दुसरा त्याच्या/तिच्या जन्माच्या वेळी बेकायदेशीर स्थलांतरित नाही याचा पुरावा.

२. वंश, नोंदणी, नैसर्गिकीकरण इत्यादीनुसार नागरिकत्व प्राप्त केले असेल तर कायद्यानुसार आणि पडताळणी अधिकाऱ्याचे समाधान होईल अशी संबंधित कागदपत्रे घेण्यात यावी.

ड. पत्याचा पुरावा (Address Proof) :-

अर्जदाराने नमुद केलेला पत्ता खरा असल्याची प्रत्यक्ष भेट देवुन खात्री करावी. तसेच दिलेल्या पत्त्यावर अर्जदार राहत असल्याबाबत शेजारी, सुरक्षा रक्षक इत्यादींकडुन चौकशी करुन खात्री करावी व अर्जदार किती वर्षापासुन वास्तव्यास आहे. तसेच सर्व साधारण चारीत्र्याबाबत चौकशी करावी.

अर्जदार स्वत:च्या घरात, वाटप केलेल्या/भाडेकरार किंवा नातेवाईक/मित्र इ. घरात प्रत्यक्षात वास्तव्य करीत असलेला असावा व त्या संबंधित पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे आहेत. प्रत्याक्षात खालील वर्गवारी प्रमाणे वास्तव्य न करणारा अर्जदार यांना पत्त्याच्या पुरावा म्हणून खालील वर्गवारी प्रमाणे पात्र समजण्यात येणार नाही.

१. अर्जदार स्वत:च्या घरात राहत असेल तर (कोणतेही एक)

I. महानगर टेलिफोन निगमचे देयक.

II. विद्युत/महानगर गॅस/पाणी देयक अथवा मालमत्ता कर/देखभाल पावती.

III. नोंदणीकृत विक्री करार.

२. वाटप केलेल्या/भाडयाच्या जागेत भाडेकरारवर राहणारा अर्जदार (कोणतेही एक)

I. महानगर टेलिफोन निगमचे देयक.

II. विद्युत/महानगर गॅस/पाणी देयक अथवा मालमत्ता कर/देखभाल पावती.

III. भाडयाची पावती अथवा निवासस्थान वाटप पत्र.

IV. भाडे करार (**Register Rent Agreement** )

३. अर्जदार नातेवाईक/मित्र इत्यादींच्या घरात राहत असेल तर :-

घराच्या मालकाकडुन हमीपत्र (कोऱ्या कागदावर शक्यतो घरमालकाच्या हस्ताक्षरात) घेण्यात यावे. त्यामध्ये अर्जदाराचा खरेपणा (**Bonafides**), वास्तव्याचा कालावधी आणि अर्जदाराशी असलेले नाते नमुद केलेले असावे. त्यासोबत घरमालकाच्या पत्त्याचा पुरावा घेण्यात यावा. (कोणतेही एक)

I. महानगर टेलिफोन निगमचे देयक.

II. विद्युत/महानगर गॅस/पाणी देयक अथवा मालमत्ता कर/देखभाल पावती.

III. नोंदणीकृत विक्री करार.

४. मुक्कामाच्या कालावधीचा पुरावा :-

दिलेल्या पत्त्यावर अर्जदाराच्या मुक्कामाच्या कालाधीची पुष्टी करणारे वरीलपैकी कोणतेही एक कागदपत्र घेण्यात यावे. (विदेश मंत्रालय विभागाच्या (**MEA**) दि. १९/०५/२०२० रोजीच्या पत्रानुसार अर्जदार यांनी पारपत्रासाठी अर्ज करताना सध्या राहत असलेल्या ठिकाणाचा पुरावा जोडणे आवश्यक आहे. **तथापी अर्जदाराने अर्ज केलेल्या तारखेपासुन मागील एका वर्षाच्या कालावधीमध्ये ज्या ज्या ठिकाणी वास्तव्य केले आहे ते नमुद करणे आवश्यक आहे.**)

५. गुन्हेगारी पार्श्वभुमीवर (**Criminiality**) :-

सदरबाबत प्रामुख्याने सी.सी.टी.एन.एस. (**CCTNS**), आय.सी.जे.एस.(**ICJS**) प्रणालीचा वापर तसेच (**Local Crime Record**) चेक करावा. त्यामध्ये अर्जदाराचे नाव हे जन्मतारीख तसेच वेगवेगळी स्पेलींग वापरुन तपासण्यात यावे.

अर्जदार यांचेविरुद्ध भारताचे सार्वभौमत्व, अखंडता धोक्यात येईल असे देशविघातक कृत्ये उदा. **UAPA Act,** (Unlawful Activities (Prevention) Act.) भारतीय दंड संहिता प्रकरण - ६ मध्ये दिलेल्या देशविरोधी, अपराधांविषयी केलेली कृत्ये, **UAPA** या कायद्याखालील गुन्हे इ. अनुषंगाने केलेली प्रतिबंधक कारवाई याबाबत पडताळणी करण्यात यावी.

## भाग – २

➢ सर्व बाबत चौकशी करुन झाल्यानंतर पारपत्र कागदपत्रांच्या पडताळणी नंतर सध्या उपलब्ध **PVR** असलेला फॉर्म भरताना खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

1. **PVR** फॉर्ममधील पार्ट- **A** मधील अनुक्रमांक १ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने नागरिकत्वाचा पुराव्याच्या कागदपत्रांची म्हणजेच या परिपत्रकातील भाग-१ क प्रमाणे दिलेल्या नागरिकत्वाच्या पुराव्याबाबत कागदपत्रांच्या यादीनुसार तपासणी करावी.

2. **PVR** फॉर्ममधील पार्ट- **A** मधील अनुक्रमांक २ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने सी.सी.टी.एन.एस. (**CCTNS**) व आय.सी.जे.एस. (**ICJS**) प्रणालीचा वापर तसेच **(Local Crime Record)** तपासून करुन अर्जदाराविरुद्ध मा. न्यायालयात खटला सुरु आहे किंवा कसे याची तपासणी करावी.

3. **PVR** फॉर्ममधील पार्ट- **A** मधील अनुक्रमांक ३ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने सी.सी.टी.एन.एस. (**CCTNS**) व आय.सी.जे.एस. (**ICJS**) प्रणालीचा वापर तसेच **(Local Crime Record)** तपासून करुन अर्जदाराविरुद्ध मा. न्यायालयात खटला असल्यास अर्जदाराला कोणत्याही गुन्ह्यात दोषी ठरविण्यात आले असल्यास अधिकची पाच वर्षे आणि दोन वर्षे किंवा त्याहुन अधिक काळ तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे अगर कसे?

4. **PVR** फॉर्ममधील पार्ट- **A** मधील अनुक्रमांक ४ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने वर नमुद केल्याप्रमाणे सी.सी.टी.एन.एस. (**CCTNS**) व आय.सी.जे.एस. (**ICJS**) प्रणालीचा वापर तसेच **(Local Crime Record)** तपासून करावा. तसेच अर्जदाराविरुद्ध मा. न्यायालयात खटला दाखल असुन समन्स किंवा वॉरंट जारी करण्यात आले आहे कसे? सुरु आहे किंवा कसे याची तपासणी करावी.

5. **PVR** फॉर्ममधील पार्ट- **A** मधील अनुक्रमांक ५ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने वर नमुद केल्याप्रमाणे सी.सी.टी.एन.एस. (**CCTNS**) व आय.सी.जे.एस. (**ICJS**) प्रणालीचा वापर तसेच **(Local Crime Record)** चेक करुन अर्जदारा विरुद्ध खटला चालु असेल तर मा. न्यायालयाने अर्जदारास भारतातून जाण्यास मनाई करणारा आदेश दिला आहे अगर कसे ? याची तपासणी करावी.

6. **PVR** फॉर्ममधील पार्ट- **B** मधील अनुक्रमांक ६ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने भाग - १ - ड मध्ये क्र.- ५ मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

## भाग – ३

➢ पारपत्र पडताळणी करणारे पोलीस अधिकारी /गोपनिय अंमलदार आणि यांनी करावयाची कार्यवाही.

१. पारपत्र पडताळणी करताना अर्जदार यांचेकडे वर नमुद कागदपत्रांव्यतीरिक्त इतर कागदपत्रांची मागणी करु नये.

२. पारपत्र पडताळणी ही विहित वेळेत (कमीत कमी ७ दिवस व जास्तीत जास्त १४ दिवस) इकडील कार्यालयात सादर करावी.

३. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी पारपत्र पडताळणीचा दररोज आढावा घ्यावा त्याबद्दल दैनंदिनीमध्ये नोंद घ्यावी. तसेच पारपत्र प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी दर सात दिवसांनी तसेच पोलीस उप-आयुक्त यांनी दर पंधरा दिवासांनी आढावा घेऊन पारपत्र पडताळणी बाबत आढावा घेवुन गोपनिय अंमलदार यांना येणाऱ्या तांत्रिक व इतर अडचणींबाबत मार्गदर्शन करावे.

५. पंधरा दिवसांवर प्रलंबित पारपत्र राहणार नाही परंतु काही कारणास्तव सदर पडताळणीस अडचणी येत आहेत त्याबाबत तात्काळ लेखी अहवाल इकडील कार्यालयात सादर करावा तसेच अर्जदारास लेखी कळवावे.

६. भारतात जन्मलेले जन्म दाखल्याबाबत शंका (बनावट) वाटल्यास संबंधित कार्यालयास पडताळणी करावी. व त्यामुळे होणाऱ्या विलंबाबाबत अर्जदारस लेखी कळवावे.

७. जर अर्जदार यांनी सादर केलेली कागदपत्रे बनावट अथवा फसवणुकीने प्राप्त करुन घेतलेली आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी.

तरी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी सदर कार्यपद्धतीप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत संबंधित पोलीस अधकारी/अंमलदार यांना लेखी सुचना दयाव्यात. पारपात्र पडताळणी अर्ज मुदतीत इकडील कार्यालयात सादर करतील याकडे वेळोवेळी लक्ष दयावे. पोलीस उप-आयुक्त व सहा. पोलीस आयुक्त यांनी पोलीस ठाणे भेटीच्या वेळी पारपत्र पडताळणीचे कामकाज योग्य पद्धतीने चालु आहे अगर कसे? याची खात्री करावी व त्याप्रमाणे संबंधित पोलीस अधकारी/अंमलदार यांना सुचना दयाव्यात.

टिप :- पारपत्र पडताळणीकरीता सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी पोलीस ठाणे मध्ये दर्शनी भागावर लावण्यात यावी.

मा. पोलीस आयुक्त
यांचे आदेशान्वये

(प्रकाश गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त मुख्यालय
मिरा-भाईंदर वसई-विरार

प्रति :-

१. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०१, ०२ व ०३.,
२. सर्व विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त.,
३. सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी .

प्रत माहितीकरिता सादर :-

१. मा. पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.,
२. मा. अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं /२० / १९५ / पारपत्र पडताळणी कागदपत्रे /२१४ / २०१८ मुंबई, दि. ०८/१२/२०२२

## विषय :- पारपत्र पडताळणीबाबतचे परिपत्रक

**परिपत्रक :-**

पारपत्र सेवा (Passport Seva) हा भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाचा (MEA) एक उपक्रम आहे. पारपत्र आणि त्यासंबंधीत सेवा नागरिकांना सुलभतेने प्राप्त होण्याबाबत शासनाचे उदार धोरण (Liberal policy) असुन त्याकरिता पडताळणीची सोपी, पारदर्शक अशी कार्यक्षम प्रक्रिया सक्रिय करणे आवश्यक आहे. सदर विभागाने, भारतीय नागरिकांनी पारपत्र विभागाकडे पारपत्रासाठी आवेदन केल्यानंतर विहित मुदतीत पारपत्र अर्जाची पडताळणी होऊन जास्तीत जास्त नागरिकांना पारपत्र देण्याचे व्यापक धोरण अंगिकारलेले आहे.

पारपत्र अर्जाच्या पडताळणी प्रक्रियेमध्ये मुख्यत्वे पोलीस विभागाकडुन देण्यात येणारा पोलीस पडताळणी अहवाल (Police Verification Report-**परिशिष्ट-१**) ही महत्वाची प्रक्रिया आहे. त्याअनुषंगाने सदर प्रक्रियेमध्ये निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी व त्यामुळे पारपत्र अर्जदार यांना होणारा नाहक त्रास टाळण्यासाठी सोपी, कार्यक्षम आणि पारदर्शक प्रक्रिया राबविण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

पारपत्र प्राप्त होण्याकरिता अर्जदार पासपोर्ट सेवा केंद्र येथे त्याचा अर्ज सादर करतात. त्यावेळेस अर्जदार यांच्यासबंधी काही आवश्यक त्या पुराव्याच्या कागदपत्रांची आवश्यकता असते. अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची / पुराव्यांची पडताळणी होऊन वेळेत पुर्तता करणे आवश्यक आहे. जेणेकरुन पारपत्र पडताळणी प्रक्रियेमध्ये विलंब न होता त्याबाबत विहीत वेळेत पुर्तता होईल.

अर्जदार व पारपत्र पडताळणी अधिकारी यांना चांगल्या पध्दतीने आवश्यक कागदपत्रांची माहिती होईल तसेच सुरक्षेचे उद्दिष्ट अबाधित राखून, दक्षता घेत तपासणी प्रक्रिया सहज सुलभ होवुन नागरिकांना चांगली सुविधा मिळण्याच्या दृष्टीने सदर परिपत्रकान्वये सुचना देण्यात येत आहेत.

# भाग - १

**पारपत्र पडताळणीकरीता दिलेल्या निकषांच्या संदर्भात खालील कागदपत्रांची आवश्यकता असून त्यानुसार पडताळणी करावी.**

**अ. ओळखीचा पुरावा.**

जन्मतारीख, अर्जदाराचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, लिंग, छायाचित्र आणि स्वाक्षरी निश्चित करण्यासाठी अर्जदारांकडून त्यासबंधी कागदपत्रे संकलित करणे आवश्यक आहे. नमुद निकष निश्चित होण्यासाठी पुढील कागदपत्रांच्या यादीतील **कोणत्याही तीन** कागदपत्रांची आवश्यकता आहे.

१. पूर्वी धारण केलेला भारतीय पासपोर्ट

२. जन्म प्रमाणपत्र

३. परिवहन विभागाने जारी केलेला चालक परवाना (Driving License)

४. बॅंक पासबुकचे पहिले पान (सक्रिय खाते)

५. आधार कार्ड (AADHAAR)

६. निवडणुक आयोगाने जारी केलेले ओळखपत्र (EPIC)

७. आयकर विभागाने जारी केलेले पॅनकार्ड (PAN CARD)

८. रेशन कार्ड

९. शासकीय सेवेतील ओळखपत्र

१०. राज्य शिक्षण मंडळ / सीबीएसई / मान्यताप्राप्त विद्यापीठाने जारी केलेले पदवीचे प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका

११. प्राथमिक / माध्यमिक शाळांमधील नोंदी (Records) (शाळा / संस्थेत उपस्थिती संबंधित स्पष्टीकरण विचारणा करू शकता )

१२. ट्रान्सफर / शाळा सोडल्याचा दाखला / शेवटी शिकत असलेल्या शाळेने अथवा मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेने दिलेले शालांत प्रमाणपत्र.

१३. पालकांचे पारपत्र ज्यावर अर्जदाराचे नाव नमुद असेल.

१५. आयकर मुल्यांकनाचे आदेश (ITR RETURN)

१६. राजपत्र अधिसूचना (नाव बदलल्यास)

**ब. जोडीदाराच्या नावाचा पुरावा (Name of Spouse).**

१. सक्षम प्राधिकरणाने जारी केलेले विवाह प्रमाणपत्र (Marriage Certificate)

२. मा. न्यायालयाची घटस्फोट डिक्री

३. पूर्वी धारण केलेला भारतीय पासपोर्ट ज्यावर जोडीदाराचे नाव छापलेले असेल.

४. राजपत्र अधिसूचना

**क. राष्ट्रीयत्वाचा पुरावा.**

भारतीय राज्यघटना, नागरिकत्व कायदा आणि नागरिकत्व प्राप्त करण्याच्या विविध पध्दतीनुसार, एखाद्या व्यक्तीचे नागरिकत्व निश्चित करण्यासाठी जी निर्णायक कागदपत्रे आवश्यक असतील, ज्यायोगे पडताळणी अधिकाऱ्याचे समाधान होईल ती कागदपत्रे घेण्यात यावीत.

१. जन्मानुसार नागरिकत्वासाठी कागदपत्रे.

I) २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर आणि १ जुलै १९८७ पूर्वी भारतात जन्मलेले.

१. पूर्वी धारण केलेला भारतीय पासपोर्ट किंवा

२. जन्म प्रमाणपत्र.

३. जन्मतारीख आणि जन्म ठिकाणाचा निर्णायक पुरावा.

II) १ जुलै १९८७ रोजी किंवा त्यानंतर आणि ३ डिसेंबर २००४ पूर्वी भारतात जन्मलेले

१. पूर्वी धारण केलेला भारतीय पासपोर्ट किंवा

२. जन्म प्रमाणपत्र आणि अर्जदाराच्या पालकापैकी कोणीही एक त्याच्या / तिच्या जन्माच्यावेळी भारताचे नागरिक होते याचा पुरावा किंवा :

३. जन्मतारीख आणि जन्मस्थानाचा निर्णायक पुरावा आणि अर्जदाराच्या पालकांपैकी कोणीही एक त्याच्या / तिच्या जन्माच्या वेळी भारताचे नागरिक होते याचा पुरावा.

III) ३ डिसेंबर २००४ रोजी किंवा त्यानंतर भारतात जन्मलेले.

१. पूर्वी धारण केलेला भारतीय पासपोर्ट किंवा;

२. जन्म प्रमाणपत्र आणि अर्जदाराचे दोन्ही पालक त्याच्या / तिच्या जन्माच्या वेळी भारताचे नागरिक असल्याचा पुरावा किंवा पालकांपैकी कोणीही एक पालक भारताचा नागरिक आहे आणि दुसरा पालक त्याच्या / तिच्या जन्माच्या वेळी बेकायदेशीर स्थलांतरित नाही किंवा;

३. जन्मतारीख आणि जन्मस्थानाचा निर्णायक पुरावा आणि अर्जदाराचे दोन्ही पालक भारताचे नागरिक आहेत किंवा त्याच्या / तिच्या पालकापैकी एक भारतीय नागरिक आहे आणि दुसरा त्याच्या / तिच्या जन्माच्या वेळी बेकायदेशीर स्थलांतरित नाही याचा पुरावा.

२. वंश, नोंदणी, नैसर्गिकीकरण इत्यादीनुसार नागरिकत्व प्राप्त केले असेल तर कायद्यानुसार आणि पडताळणी अधिकाऱ्याचे समाधान होईल अशी संबंधित कागदपत्रे घेण्यात यावी.

**ड. पत्त्याचा पुरावा :**

१. अर्जदार स्वत:च्या घरात राहतो **(कोणतेही एक )**

I) महानगर टेलिफोन निगमचे देयक.

II) विद्युत देयक

III) महानगर गॅस देयक

IV) पाणी देयक / मालमत्ता कर / देखभाल पावती

V) नोंदणीकृत विक्री करार

२. वाटप केलेल्या / भाडयाच्या जागेत भाडेकरारावर राहणारा अर्जदार **(कोणतेही एक )**

I) महानगर टेलिफोन निगमचे देयक.

II) विद्युत देयक

III) महानगर गॅस देयक

IV) देखभाल पावत्या

V) भाडे करार

(विदेश मंत्रालय यांच्या दि.२०/०९/२०१७ रोजीच्या पत्रानुसार नोंदणीकृत भाडेकराराची आवश्यकता नाही- **परिशिष्ट-२**)

VI) भाडयाची पावती

VII) निवासस्थान वाटप पत्र

३. नातेवाईक / मित्र इत्यादींच्या घरात राहणारा अर्जदार :-

घराच्या मालकाकडून हमीपत्र (कोऱ्या कागदावर शक्यतो घरमालकाच्या हस्ताक्षरात ) घेण्यात यावे. त्यामध्ये अर्जदाराचा खरेपणा (Bonafides), वास्तव्याचा कालावधी आणि अर्जदाराशी असलेले नाते नमूद केलेले असावे. त्यासोबत घरमालकाच्या पत्त्याचा पुरावा घेण्यात यावा. (कोणतेही एक)

I) महानगर टेलिफोन निगमचे देयक

II) विद्युत देयक

III) महानगर गॅस देयक

IV) पाणी देयक / मालमत्ता कर / देखभाल पावती

V) नोंदणीकृत विक्री करार

४. मुक्कामाच्या कालावधीचा पुरावा

दिलेल्या पत्त्यावर अर्जदाराच्या मुक्कामाच्या कालावधीची पुष्टी करणारे वरीलपैकी कोणतेही एक कागदपत्र घेण्यात यावे.

(विदेश मंत्रालय विभागाच्या (MEA) दि.१९/०५/२०२० रोजीच्या पत्रानुसार अर्जदार यांनी पारपत्रासाठी अर्ज करतांना सध्या रहात असलेल्या ठिकाणाचा पुरावा जोडणे आवश्यक आहे. तथापी अर्जदाराने अर्ज केलेल्या तारखेपासून मागील एका वर्षाच्या कालावधीमध्ये ज्या ज्या ठिकाणी वास्तव्य केले आहे ते नमूद करणे आवश्यक आहे. **(परिशिष्ट-३))**

५. गुन्हेगारी पार्श्वभुमी (Criminality)

सदरबाबत प्रामुख्याने सी.सी.टी.एन.एस (CCTNS) व आय.सी.जे.एस.(ICJS) प्रणालीचा वापर करावा. त्यामध्ये अर्जदाराचे नाव हे जन्मतारीख तसेच वेगवेगळी स्पेलींग वापरुन तपासण्यात यावे.

अर्जदार यांचेविरुध्द भारताचे सार्वभौमत्व, अखंडता धोक्यात येईल असे देशविघातक कृत्ये उदा. UAPA Act, भारतीय दंड संहिता प्रकरण-६ मध्ये दिलेल्या देशविरोधी अपराधांविषयी केलेली कृत्ये, UAPA या कायद्याखालील गुन्हे इत्यादींच्या अनुषंगाने केलेली प्रतिबंधक कारवाई याबाबत पडताळणी करण्यात यावी.

# भाग - २

**पारपत्र कागदपत्रांच्या पडताळणी नंतर सध्या उपलब्ध असलेला PVR फॉर्म भरतांना खालील प्रमाणे दक्षता घ्यावी.**

१. **PVR फॉर्ममधील पार्ट-A मधील अनुक्रमांक १ मध्ये** पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने नागरिकत्वाच्या पुराव्याच्या कागदपत्रांची म्हणजेच या परिपत्रकातील **भाग-१, क** प्रमाणे दिलेल्या नागरिकत्वाच्या पुराव्याबाबत कागदपत्रांच्या यादीनुसार तपासणी करावी.

२. **PVR फॉर्ममधील पार्ट-A मधील अनुक्रमांक २ मध्ये** पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने सी.सी.टी.एन.एस CCTNS) आणि आय.सी.जे.एस. (ICJS) प्रणालीचा वापर करुन अर्जदाराविरुध्द मा.न्यायालयात खटला सुरु आहे किंवा कसे याची तपासणी करावी.

३. **PVR फॉर्ममधील पार्ट-A मधील अनुक्रमांक ३** मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने सी.सी.टी.एन.एस (CCTNS) आणि आय.सी.जे.एस. (ICJS) प्रणालीचा वापर करुन अर्जदाराविरुध्द मा.न्यायालयात खटला सुरु आहे किंवा कसे याची तपासणी करावी.

४. **PVR फॉर्ममधील पार्ट-A मधील अनुक्रमांक** ४ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने वर नमूद केल्याप्रमाणे सी.सी.टी.एन.एस आणि आय.सी.जे.एस. प्रणालीचा वापर करावा. तसेच अर्जदाराविरुध्द स्थानिक न्यायालयात खटला दाखल असून समन्स किंवा वॉरंट जारी करण्यात आले आहे किंवा कसे? सुरु आहे किंवा कसे याची तपासणी करावी.

५. **PVR फॉर्ममधील पार्ट-A मधील अनुक्रमांक** ५ मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, प्रामुख्याने वर नमूद केल्याप्रमाणे सी.सी.टी.एन.एस CCTNS) आणि आय.सी.जे.एस. (ICJS) प्रणालीचा वापर करावा.

६. **PVR फॉर्ममधील पार्ट-B मधील अनुक्रमांक ६** मध्ये पडताळणी करुन माहिती भरताना, **भाग- १- ड, ५** मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

## भाग - ३

**पडताळणी करणारे पोलीस अधिकारी / अंमलदार आणि पर्यवेक्षीय अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही.**

१. पडताळणी करतांना अर्जदार यांचेकडे अनावश्यक कागदपत्रांची मागणी करु नये.

२. पारपत्र पडताळणी ही विहित वेळेत सादर करावी.

३. पारपत्र पडताळणीच्या कार्यवाहीचा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी दररोज आढावा घ्यावा.

४. सहायक पोलीस आयुक्त / उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी प्रत्येक तीन दिवसांनी तसेच पोलीस उप आयुक्त / पोलीस अधीक्षक यांनी दर सात दिवसांनी आढावा घेऊन पडताळणी प्रकरणीय येणाऱ्या तांत्रिक व इतर अडचणींबाबत मार्गदर्शन करुन प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

टीप :-

१. पोलीस पडताळणीदरम्यान अर्जदाराने सर्व मूळ कागदपत्रांसह स्व-साक्षांकित प्रती सादर केल्या पाहिजेत.

२. या आदेशामध्ये ज्या बाबी /प्रकरणांबाबत चर्चा करण्यात आलेली नाही अशा प्रकरणांमध्ये शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास संबंधित पोलीस पडताळणी अधिकाऱ्यांकडून सुचना (आवश्यक असल्यास) घ्याव्यात.

३. जर सादर केलेली कागदपत्रे बनावट अथवा फसवणुकीने प्राप्त करुन घेतलेली आढळल्यास संबंधीतांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

भारंबे

**( मिलिंद भारंबे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.)
पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)

प्रत माहितीकरीता:

सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
सर्व परिक्षेत्रिय पोलीस उप महानिरीक्षक.